सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

वर्ष - ४ थे | अंक - ७७ वा | अमरावती (महाराष्ट्र) | मंगळवार दि. २८ एप्रिल २०२६ | संपादक - डॉ. शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -४

## विधानपरिषदेसाठी दिल्लीतून आदेश येताच भाजपची अर्धी यादी बाद

### केवळ १४ नावांची सुधारित यादी; प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण दिल्लीला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नवी दिल्ली**

महाराष्ट्रातील विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. १२ मे रोजी होणाऱ्या या निवडणुकीत नऊ जागांसाठी मतदान होणार असून, त्यापैकी पाच जागा भाजपच्या वाट्याला येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर उमेदवारीसाठी पक्षात जोरदार स्पर्धा पाहायला मिळत आहे. अनेक इच्छुकांनी आपापली ताकद लावली असून, पक्षाच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र भाजपच्या कोअर कमिटीने ३० जणांची यादी तयार करून ती दिल्लीतील पक्षश्रेष्ठींकडे पाठवली होती. मात्र, ही यादी पाहिल्यानंतर केंद्रीय नेतृत्वाने मोठा निर्णय घेतला. या यादीतील जवळपास अर्धी नावे कमी करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानंतर राज्यातील नेतृत्वाने फेरविचार करून केवळ १४ नावांची सुधारित यादी पुन्हा दिल्लीला पाठवली आहे. त्यामुळे मूळ यादीतील कोणाची नावे वगळली गेली, याची चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. दरम्यान, उमेदवारी मिळवण्यासाठी भाजपमध्ये मोठी चढाओढ सुरू असल्याचे दिसून येत आहे. अनेक इच्छुक उमेदवार शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न करत असून, काही जणांकडून नाराजीही व्यक्त होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे कोणालाही दुखावू न देता अंतिम यादी जाहीर करण्यासाठी पक्षाने विशेष खबरदारी घेतली आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर भाजपने उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच ३० एप्रिलला अंतिम यादी जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे.



**अंतिम पाच उमेदवारांची नावे निश्चित केली जाणार**

या प्रक्रियेत महत्त्वाची बाब म्हणजे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण स्वतः दिल्लीला रवाना झाले आहेत. तेथे केंद्रीय नेत्यांसोबत चर्चा करून अंतिम पाच उमेदवारांची नावे निश्चित केली जाणार आहेत. पुढील काही तासांत किंवा दिवसांत या नावांवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता अंतिम यादीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, विधानपरिषदेच्या या निवडणुकीत मुंबई वगळता राज्यातील पाच विभागांमधून उमेदवारांना संधी दिली जाणार आहे. यावेळी पक्षाकडून जुने आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना प्राधान्य दिले जाणार असल्याची चर्चा आहे. तसेच जातीय आणि प्रादेशिक समीकरणांचा विचार करून उमेदवारांची निवड केली जाणार असल्याचेही सांगितले जात आहे. त्यामुळे यावेळी अनेक नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**संघटनात्मक काम करणाऱ्यांना प्राधान्य–** दरम्यान, संभाव्य उमेदवारांमध्ये माधवी नाईक, डॉ. उपेंद्र कोठेकर, मनोज कोटक, केशव उपाध्ये, रवी अनासपुरे, राजेश पांडे, दयाशंकर तिवारी, राम सातपुते, रणजितसिंह निंबाळकर, संजय काका पाटील, विवेक कोल्हे, जगदीश मुळीक, प्रमोद जठार, संजय केणेकर, अर्चना पाटील चाकूरकर, दादाराव केचे आणि संजय भेंडे यांची नावे चर्चेत आहेत. मात्र, अंतिम संधी कोणाला मिळते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. भाजपने यावेळी निवडणुकीत पराभूत झालेल्यांना संधी न देता संघटनात्मक काम करणाऱ्यांना प्राधान्य देण्याची भूमिका घेतल्याचेही समोर येत आहे. त्यामुळे या निवडणुकीत अनेकांना आशा आणि काहींना धक्का बसण्याची शक्यता आहे.

## बच्चू कडूंचा मोठा राजकीय निर्णय? शिवसेनेत प्रवेशाची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

विधानपरिषद निवडणुकीच्या तोंडावर राज्यातील राजकारणाला नवा ट्विस्ट मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. प्रहार जनशक्ती संघटनेचे प्रमुख बच्चू कडू शिवसेनेत प्रवेश करण्याच्या चर्चांना वेग आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेकडून बच्चू कडू यांना विधानपरिषदेची उमेदवारी देण्याचा प्रस्ताव देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे येत्या काही तासांत बच्चू कडू कोणता निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या पार्श्वभूमीवर बच्चू कडू आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यात महत्त्वपूर्ण चर्चा झाल्याचे समजते. या बैठकीत प्रहार जनशक्ती संघटना शिवसेनेत विलीन करण्याबाबत सविस्तर

**विधानपरिषदेसोबत विदर्भातील पक्षाचे सर्व अधिकार आणि मंत्रिपदाचीही मागणी**



चर्चा झाल्याची माहिती आहे. शिवसेनेतील काही नेत्यांनी बच्चू कडू पक्षात नसताना त्यांना उमेदवारी देण्यास विरोध दर्शवला होता. त्यामुळेच ‘प्रहार’चा विलय हा पर्याय पुढे आला असल्याचे बोलले जात आहे. मात्र, त्याच बरोबर कडू यांच्या पक्षाकडून विदर्भातील पक्षाचे सर्व अधिकार आणि मंत्रिपदाची मागणी करण्यात आली असल्याची माहितीही समोर आली आहे.

मात्र, बच्चू कडू यांनी अद्याप कोणताही अंतिम निर्णय जाहीर केलेला नाही. विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत जवळ आली असताना ते शिवसेना नेत्यांच्या भेटीगाठी घेत असल्याची माहिती आहे. शिवसेनेकडून त्यांचे नाव आघाडीवर असल्याचे मानले जात असले, तरी स्वतःचा पक्ष विलीन करायचा की स्वतंत्र ओळख कायम ठेवायची, हा मोठा प्रश्न त्यांच्या समोर उभा आहे.

प्रहार जनशक्ती संघटनेचा विलय झाला, तर शिवसेनेला त्याचा थेट राजकीय फायदा होऊ शकतो. विशेषतः विदर्भ आणि अमरावती परिसरात बच्चू कडू यांचा प्रभाव मोठा मानला जातो. या भागात सध्या भाजप आणि काँग्रेसचे वर्चस्व असले, तरी बच्चू कडू यांच्या प्रवेशामुळे शिवसेनेला नवी ताकद मिळू शकते. त्यामुळे हा निर्णय केवळ एका नेत्यापुरता मर्यादित न राहता, संपूर्ण प्रादेशिक राजकारणावर परिणाम करणारा ठरू शकतो.बच्चू कडू यांची राजकीय कारकीर्दही उल्लेखनीय राहिली आहे. ते २००४ पासून अचलपूर मतदारसंघातून सातत्याने निवडून येत आहेत. २००४, २००९, २०१४ आणि २०१९ या चार निवडणुकांमध्ये त्यांनी अपक्ष म्हणून विजय मिळवला आहे. २०१९ मध्ये त्यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाचे दोन आमदार निवडून आले होते. ठाकरे सरकारच्या काळात त्यांच्याकडे दिव्यांग कल्याण विभागाची जबाबदारीही सोपवण्यात आली होती.

**जनतेत मिसळून काम करण्याची शैली–** सामान्य लोकांचे प्रश्न, दिव्यांगांचे हक्क आणि थेट जनतेत मिसळून काम करण्याची बच्चू कडू यांची शैली वेगळी मानली जाते. ही शैली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यपद्धतीशी साधर्म्य दाखवते. त्यामुळेच शिवसेना नेतृत्व बच्चू कडू यांना आपल्या गोटात आणण्यास उत्सुक असल्याचे दिसते. आता बच्चू कडू स्वतःचा पक्ष कायम ठेवतात की शिवसेनेसोबत नवा राजकीय अध्याय सुरू करतात, यावर पुढील राजकीय समीकरणे ठरणार आहेत.

### बच्चू कडू आणि रवी राणा यांच्यात फोनवरून संवाद:चर्चेचा तपशील गुलदस्त्यात

## कट्टर वैरी एकत्र येणार? राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** राज्यात विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या जागांसाठी उमेदवारांची नावे निश्चित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना, ’प्रहार’ जनशक्ती संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांच्या उमेदवारीवरून राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. शिंदेंच्या शिवसेनेकडून बच्चू कडू यांचे नाव निश्चित असल्याची चर्चा आहे. अशातच राजकारणातील कट्टर वैरी मानले जाणारे आमदार रवी राणा आणि बच्चू कडू यांच्यात फोनवर चर्चा झाल्याची माहिती समोर आल्याने अनेक तर्क–वितर्कांना उधाण आले आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बच्चू कडू आणि रवी राणा यांच्यात नुकताच फोनवरून संवाद झाला आहे. या दोन नेत्यांमधील वाद सर्वश्रुत असताना, विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोघांमध्ये झालेली चर्चा नेमकी कशासाठी होती? हे अद्याप गुलदस्त्यात आहे. मात्र, या फोन कॉलमुळे शिंदे गटाच्या शिवसेनेतील अंतर्गत हालचालींना वेग आला आहे.

**विलीनीकरणासाठी बच्चू कडूंच्या अटी–** शिवसेनेकडून विधान परिषदेसाठी नीलम गोऱ्हे आणि बच्चू कडू यांची नावे चर्चेत आहेत. मात्र, बच्चू कडू यांना उमेदवारी देताना ’प्रहार’ संघटना शिवसेनेत विलीन



करण्याबाबत चर्चा सुरू आहे. यावर बच्चू कडू यांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी सावध भूमिका घेतल्याचे समजते. आधी विधान परिषदेची आमदारकी घ्यावी, त्यानंतर सहा महिन्यांनी मंत्रिपद मिळाल्यावरच पक्षाचे विलीनीकरण करावे. विलीनीकरण करायचे असल्यास शिवसेनेचे विदर्भ विभागाचे पूर्ण सूत्र ’प्रहार’च्या हाती द्यावे, अशी मागणी प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केल्याची चर्चा आहे. सूत्रांनुसार, सध्या आमदारकी आणि सहा महिन्यांनी मंत्रिपद देण्याचे आश्वासन द्यावे अशीही मागणी मिळाल्याचे बोलले जात आहे.

**रवी राणांची मंत्रिपदाची जाहीर इच्छा**

दुसरीकडे, आमदार रवी राणा यांनीही एका सभेत बोलताना मंत्रिपदाची आपली प्रबळ इच्छा बोलून दाखवली आहे. मी चार वेळा आमदार झालो असून १० आमदारांचे काम एकटाच करतो. जर मुख्यमंत्र्यांची कृपा झाली आणि मी मंत्री झालो, तर १० मंत्र्यांचे काम मी एकटा करून दाखवेन, असा आत्मविश्वास रवी राणा यांनी व्यक्त केला. कडू आणि राणा या दोघांनीही मंत्रिपदावर डोळा ठेवल्याने अमरावतीच्या राजकारणातील ही स्पर्धा आता मुंबईपर्यंत पोहोचली आहे.

## ‘मिशन लक्षवेध’ अंतर्गत कुस्ती खेळाडूंची फेर निवड चाचणी

### ६ मे रोजी आयोजनइच्छुक खेळाडूंनी आपले अर्ज ३० एप्रिलपर्यंत सादर करावेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती,**

ऑलिम्पिक स्तरावरील क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने ’मिशन लक्षवेध’ ही महत्त्वकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत अमरावती जिल्हा स्तरावर ’क्रीडा प्रतिभा विकास केंद्र’ स्थापन करण्यात आले असून, कुस्ती या क्रीडा प्रकारासाठी २० खेळाडूंची निवड करण्यासाठी येत्या ६ मे २०२६ रोजी फेर निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या चाचणीत जिल्ह्यातील पात्र खेळाडूंना सुवर्णसंधी मिळणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दिली आहे. ही निवड चाचणी ६ मे रोजी सकाळी ८ वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे पार पडणार आहे. या खेळाचे आयोजक राहुल निवडंगे ( ७७७४००१५७९) आहेत. यापूर्वी ९ एप्रिल रोजी चाचणी घेण्यात आली होती, मात्र आता पात्र खेळाडूंसाठी पुन्हा एकदा फेर चाचणीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रक्रियेसाठी २१ वर्षांखालील (३१ डिसेंबर २०२६ रोजी वय ग्राह्य) मुले व मुली पात्र असून, खेळाडू महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे अनिवार्य आहे. तसेच, संबंधित खेळाडूने गेल्या दोन वर्षांत राज्यस्तरावरील शालेय किंवा अधिकृत क्रीडा संघटनेच्या स्पर्धेत सहभाग घेतलेला असावा किंवा पदक प्राप्त केलेले असावे. निवड चाचणीसाठी येताना खेळाडूंनी आपला जन्मदाखला, शाळा सोडल्याचा दाखला, अधिकृत डॉक्टरांचे फिटनेस प्रमाणपत्र, आधारकार्ड, क्रीडा कामगिरीची प्रमाणपत्रे, पालकांचे संमतीपत्र आणि पासपोर्ट साईज फोटो सोबत आणणे आवश्यक आहे. निवड झालेल्या २० खेळाडूंना शासनाच्या वतीने प्रगत प्रशिक्षण दिले जाईल. ही प्रक्रिया अनिवासी स्वरूपाची असली तरी खेळाडूंचा पूरक आहार, गणवेश, क्रीडा साहित्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा प्रवास खर्च, वैद्यकीय उपचार आणि विम्याचा संपूर्ण खर्च मिशन लक्षवेध योजनेअंतर्गत केला जाणार आहे. इच्छुक खेळाडूंनी आपले अर्ज ३० एप्रिल २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, तपोवन चौक, अमरावती येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. या निवड चाचणीचे आयोजन क्रीडा कार्यकारी अधिकारी श्रीमती ममता कोळमकर ( ९८२३७०४३४७) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून, जिल्ह्यातील जास्तीत –जास्त कुस्तीगीरांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ‘वडेट्टीवारांचे दहा बाप आले तरी माझी काय’

### गायकवाड पुन्हा घसरले, पवारांनाही सुनावलं

विदर्भ प्रजासत्ताक



**दि.२८बुलढाणा–** शिवसेना ( शिंदे गट ) आमदार संजय गायकवाड यांनी ‘शिवाजी कोण होता?’ या पुस्तकाच्या शीर्षकावरून आक्षेप घेत प्रकाशक प्रशांत आंबी यांना अश्लील भाषेत शिवीगाळ केली होती. त्यापार्श्वभूमीवर बुलढाण्यात राजकीय पक्षासह सामाजिक संघटना आज ( २८ एप्रिल ) आमदार गायकवाडांच्या कार्यालयावर मोर्चा काढून ‘शिवाजी कोण होता?’ पुस्तकाचे वाचन करणार आहेत. यावरून आमदार संजय गायकवाडांनी थेट इशारा दिला आहे. तसेच, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आमदार विजय वडेट्टीवार, आमदार रोहित पवार यांच्यावर सडकून टीका केली आहे.

आमदार गायकवाड म्हणाले, शिवभक्तांच्या जखमेवर मीठ चोळण्यासाठी जाणूनबुजून जे पुस्तक झापलं, त्याच्या २० लाख प्रती विकल्या तरी बुलढाण्यात येऊन पुस्तक वाचण्याची आवश्यकता काय आहे? पुस्तक वाचायला आले तर आम्ही ऐकायला जाणार आहोत. पुस्तक वाचताना छत्रपती शिवाजी महाराजांचा सन्मानपूर्वक उल्लेख केला, तर आम्ही टाळ्या वाजवून स्वागत करणार आहे. पण, छत्रपतींबद्दल एकेरी भाषा वापरून आमच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रयत्न करण्यात आला, तर याची जबाबदारी आयोजक आणि पुस्तक वाचणाऱ्याची राहणार आहे.

एखादा कोल्हापूरचा लांडगा बुलढाण्यात येईल आणि कोल्हेकुई करेल, आमच्या गावात आग लावेल, विनाकारण कायदा सुव्यवस्था निर्माण करेल, असे वाटले असल्याने मंडप वाल्याने मंडप स्वतःच काढून घेतला आहे. शिवाजी शिक्षण संस्थेचं नाव बदलण्यात यावे, कोणत्याही संस्थेला नाव देताना छत्रपती शिवाजी महाराज हेच नाव देण्यात यावे, अशी मीच नाही, अनेक आमदारांनी मागणी केली आहे. प्रशांत आंबींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी आमच्या लोकांनी केली आहे. महाराष्ट्रातील शिवभक्तांचा अपमान झाला आहे.

## शरद पवारांनी पुण्यात बोलावली कुटुंबाची बैठक, कारण काय अन् कोण-कोण उपस्थित राहणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८पुणे**

उपमुख्यमंत्री, दिवंगत अजित पवार यांच्या निधनानंतर पवार कुटुंब पहिल्यांदाच पुण्यात एकत्र येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ( शरदचंद्र पवार ) अध्यक्ष शरद पवार यांनी पुण्यात पवार कुटुंबाची बैठक बोलावली आहे. स्नेहभोजनाच्या निमित्ताने पवार कुटुंब हे मोदी बाग येथे एकत्र येणार आहे, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

अलीकडेच शरद पवारांना रूग्णालयातून डिस्चार्ज मिळाला आहे. त्यानंतर शरद पवारांनी मोदीबागेत पवार कुटुंबाला एकत्र बोलावलं आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार सुप्रिया सुळे, राजेंद्र पवार, श्रीनिवास पवार, इंद्रजित पवार, आमदार रोहित पवार, खासदार पार्थ पवार, युगेंद्र पवार यांना शरद पवारांनी मोदी बाग येथे बोलावलं आहे. जय पवार हे परदेशात असल्याने उपस्थित राहू शकणार नाहीत. सुनेत्रा पवारही मुंबईत आहेत. त्यामुळे आता कोण–कोण उपस्थित राहणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. स्नेहभोजनाच्या निमित्ताने पवार



कुटुंब एकत्र येत असले तरी राजकीय चर्चा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

बारामतीच्या पोटनिवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीने सुनेत्रा पवारांना पाठिंबा जाहीर केला होता. तसेच, रोहित पवारांनी अनेक ठिकाणी सुनेत्रा पवारांसाठी बैठक सुद्धा घेतल्या होत्या. दुसरीकडे सुप्रिया सुळेंनी बारामतीत सुनेत्रा पवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या महायुतीच्या मेळाव्याला देखील उपस्थित लावली होती.

त्यातच जय पवार बोलून गेले होते की, ‘लोकांची इच्छा आहे, मी २०२९ मध्ये बारामतीतून विधानसभा निवडणूक लढवावी.’ त्यावर रोहित पवारांनी म्हटलं होते की, ‘२०२९ मध्ये पवार विरुद्ध पवार,’ अशी निवडणूक होऊ शकते. मात्र, युगेंद्र पवारांनी यास स्पष्ट नकार देत, ‘पवार विरुद्ध पवार, अशी निवडणूक होऊ नये,’ असे बोलून दाखवलं होते.

त्यामुळे या बैठकीत २०२९ मधील निवडणूक, राष्ट्रवादीचे विलीनीकरण आणि विविध विषयांवर चर्चा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. तसेच, सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवती सुळे यांचे लग्न ठरलं आहे. त्यानिमित्त स्नेहभोजनाचा कार्यक्रम आहे, अशी देखील माहिती मिळत आहे.

## संपादकीय ......

# भाडोत्री बाबांचा बेछूट भंपकपणा!

*मध्य प्रदेशातील बागेश्वर धामचे बागेश्वर बाबा म्हणजेच धीरेंद्र शास्त्री यांनी महाराष्ट्रात येऊन महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि प्रेरणास्थान छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल जे वादग्रस्त विधान केले आहे, त्यामुळे विशेषत: राज्यात सत्ताधारी असलेल्या भाजपची मोठी गोची झाली आहे. त्या मुद्द्यावरून भाजपला विरोधकांनी कोंडीत पकडले आहे. विषय शिवरायांचा असल्यामुळे भाजपलाही तोंड उघडणे मुष्कील झाले आहे. तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला आहे. कारण फडणवीस यांना बागेश्वर बाबांना दुखवून उत्तर भारतीयांना नाराज करायचे नाही. खरे तर मुख्यमंत्र्यांना बागेश्वर यांच्या अज्ञानाबद्दल चार खडे बोल त्यांना सुनावता आले असते, पण त्यांनी तसे केले नाही, पण हेच जर अन्य कुणी केले असते, तर ते त्यांनी गळ्याच्या शिरा ताणून छत्रपती शिवाजी महाराज कसे महान होते, हे सांगून त्यांचा महिमा गायला असता. पण बागेश्वर यांच्याबाबत ते फारसे काही बोलताना दिसत नाहीत. त्यात बागेश्वर यांनी बोलताना समर्थ रामदास यांना मोठेपण दिलेले आहे. त्यामुळे फडणवीस त्याविरोधात जास्त आक्रमक भूमिका घेणार नाहीत हे ओघाने आलेच. नागपूरच्या जामठा येथे असलेल्या नॅशनल कॅन्सर हॉस्पिटल परिसरात शुक्रवारी भारतदुर्गा मंदिराचे भूमिपूजन व कोनशिला अनावरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांचे उदाहरण देताना बागेश्वर म्हणाले होते की, एका मोहिमेनंतर शिवाजी महाराज थकले होते आणि ते समर्थ रामदास स्वामींकडे गेले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपला मुकुट काढून समर्थ रामदास स्वामींच्या पायाशी ठेवत आपण थकलो असून आता राज्यकारभार आपण सांभाळावा, अशी विनंती केली होती. त्यावर रामदास स्वामींनी 'तू माझा शिष्य आहेस आणि मी तुझा गुरू' असे सांगत पुन्हा मुकुट छत्रपती शिवाजी महाराजांच्या मस्तकावर ठेवला आणि राज्यकारभार चालवण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली.*

*मुळात अशा ऐतिहासिक व्यक्तींबद्दल बोलताना बागेश्वर यांच्याकडे तसे काही पुरावे आहेत का, हा एक प्रश्न आहे. ही व्यक्तिमत्वे होऊन गेलेली आहेत. हे काही दंतकथेतील नायक नाहीत. त्यामुळे त्यांच्याविषयी भाष्य करताना ते जबाबदारीने करायला हवे. मुळात बागेश्वर यांच्यासारखी माणसे आध्यात्मिक प्रवचने सांगत असतात. बागेश्वर हे लोकांच्या मनात काही आहे ते जाणतात, ते लिहून देतात. अगदी त्यांच्या सांस्कृतिक मेळाव्यात कुणाची वस्तू चोरीला गेली तेही त्यांना कळते, ते नावासह सांगतात, असे मानले जाते. सोशल मीडियामुळे त्यांची सगळीकडे वेगाने प्रसिद्धी झालेली आहे. त्यांच्या चमत्कारामुळे तर ते अल्पावधीत आणि कमी वयात सर्वदूर पोहोचले आहेत. विशेषत: हिंदू धर्मियांवर त्यांचा मोठा प्रभाव आहे. त्यामुळेच ते भाजपला जास्त प्रिय आहेत. परिणामी अशा माणसाने वादग्रस्त वक्तव्य केले असले तरी त्याला लगेच दुखावता येत नाही. अर्थात, बागेश्वर यांच्या वक्तव्यानंतर महाराष्ट्रातून अनेकांकडून संताप व्यक्त करण्यात आला. त्यात काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे लोक जास्त ताकदीने उतरले. सातारा आणि कोल्हापूर येथील राजघराण्यातील मान्यवर बागेश्वर यांच्याविरोधात उतरले. त्यांनी बागेश्वरवरून भाजपला टार्गेट केले.*

*अगोदरच महाराष्ट्रात एका भोंदू बाबामुळे भाजपचे वांदे झालेले आहेत. कारण मंत्रिमंडळातील बरेच आमदार आणि मंत्री त्या बाबाचे भक्त असल्याचे उघड झालेले आहे. त्यामुळे आधीच एका भोंदू बाबामुळे बेजार त्यात पुन्हा या बाबामुळे डोकेदुखी वाढली. त्यामुळे भाजपकडून त्याला काही सूचना गेल्या असाव्यात. त्यामुळे बागेश्वर यांनी आपल्या वक्तव्याबद्दल माफी मागितली. त्यांनी माफी मागितली हे योग्य झाले. पण अशा प्रकारचे वक्तव्य करण्याचे त्याचे प्रेरणास्थान कुठले आहे, याचा शोध घ्यायला हवा. कारण हे बागेश्वर बाबा स्वत:ला हिंदुत्ववादी म्हणवतात, तर मग त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास वाचला असेल तर त्यांना आपण काय बोलतोय याचे भान असायला हवे होते. महाराष्ट्रात येऊन जर ते उत्तर भारतामध्ये अजूनही भक्कम असलेले वर्णश्रेष्ठत्व रुजवू पहात असतील, तर ते कदापिही योग्य नाही. कारण महाराष्ट्र हा नेहमीच पुरोगामी राहिलेला आहे, त्यामुळे महाराष्ट्राकडून अन्य राज्यांनी सामाजिक सुधारणेचा कित्ता गिरवलेला आहे. त्यामुळे बाबा बागेश्वर यांनी असले उद्योग इथे करू नयेत.*

# नगरसेवकांना आता 'मिनी महापौर' पदांचे डोहाळे

## पाचही झोन सभापती पदांसाठी उद्या निवडणूक

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२८अमरावती**

नगरसेवकांना आता झोन सभापती अर्थात 'मिनी महापौर पदाचे डोहाळे लागले असून, या पाचही पदांसाठीउद्या बुधवार, २९ एप्रिल रोजी निवडणूक होणार आहे. दरम्यान, झोन अंतर्गत प्रभागांतील नगरसेवकांच्या संख्याचळावर ही निवडून होणार असल्याने भाजपासह युवा स्वाभिमान व एमआयएमच्या वाट्याला झोन सभापती पद येणार असल्याचे निश्चित असून, महायुतीमधील मित्रपक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस व इतरांनाही आलटून पालटून एक झोन मिळण्याची शक्यता आहे. काँग्रेसला मात्र या पदासाठी



दुसऱ्या पक्षासोचत आघाडी केल्याशिवाय पर्याय नसल्याचे चित्र आहे.स्व. सुदामकाका देशमुख सभागृहात बुधवारी पीठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांच्या अध्यक्षतेत ही निवडणूक होणार आहे. झोन १ रामुपरी कैम्प अंतर्गत भाजपाचे नऊ, काँग्रेसचे पाच, राष्ट्रवादी काँग्रेसचे चार, युवा स्वाभिमानचे एक, शिंदेंच्या शिवसेनेचे एक, तर उद्धव ठाकरे गटाचे एक अशाप्रकारे एकूण २१ नगरसेवक आहेत. झोन दोन राजापेठ अंतर्गत भाजपाचे नऊ, युवा स्वाभिमानचे चार, राष्ट्रवादीचे दोन तर शिंदेंच्या शिवसेनेचे एक अशाप्रकारे १६ नगरसेवक आहेत. झोन तीन दस्तूरनगर अंतर्गत भाजपाचे चार, बसपाचे तीन, काँग्रेसचे पाच व राष्ट्रवादीचे चार, अशाप्रकारे १६ नगरसेवक आहेत. झोन चार बडनेरा अंतर्गत भाजपाचे तीन, युवा स्वाभिमानचे सात, शिंदेंच्या शिवसेनेचे दोन, एमआयएमचे तीन व उद्धव ठाकरे गटाचे एक, अशाप्रकारे १६ नगरसेवक आहेत, तसेच झोन पाच भाजीबाजार अंतर्गत काँग्रेसचे चार, युवा स्वाभिमानचे तीन, भाजपाचे एक व एमआयएमचे नऊ आणि वंचित बहुजन आघाडीचे एक, अशाप्रकारे १८ नगरसेवक आहेत. त्यानुसार प्रत्येक झोनसाठी झोनमधील नगरसेवक हात उंचावून मतदान करणे अपेक्षित असून, ही निवडणूक बिनविरोधही होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### रामपुरी कॅम्प व राजापेठमध्ये भाजपाचे वर्चस्व

रामपुरी कॅम्पध्ये व राजापेठ झोनमध्ये भाजपाचे सर्वाधिक म्हणजे प्रत्येकी नऊ नगरसेवक आहे. त्यामुळे येथे भाजपाचाव सभापती होणे निश्चित असून, बडनेरा झोनमध्ये युवा स्वाभिमानचा सभापती होणार आहे. भाजीबाजार झोनमध्ये एमआयएमचे सर्वाधिक नऊ नगरसेवक असून, येथे एमआयएम व काँग्रेस आपापसात सभापती पद वाटून घेण्याची रणनिती सुस आहे याशिवाय दस्तूरनगर झोनमध्ये मात्र महायुती म्हणून निर्णय घेतल्या जाण्याची शक्यता आहे.

# मेळघाटात भिषण जलसंकट

## ८ गावांना १९ टँकरने पाणीपुरवठा सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मेळघाट** – तापमानात वाढ झाल्याने मेळघाटातील जलसंकट अधिक गंभीर झाले आहे. चिखलदरा तालुक्यातील आठ गावांमध्ये सध्या १९ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. या गावांमध्ये भूगर्भात पाण्याचा कोणताही स्रोत उपलब्ध नसल्यामुळे टँकरशिवाय पाणीपुरवठा करण्याचा दुसरा कोणताही पर्याय नसल्याचे जिल्हा परिषद प्रशासनाने म्हटले आहे.



जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाच्या नोंदीनुसार, या आठही गावांमध्ये रहिवाशांसाठी दररोज पिण्याच्या पाण्याचे टँकर पाठवले जात आहेत. यामध्ये मोथा, खडीमल, गौलखेडा बाजार, बहादरपुर, आकी, मेहरियम, अलडोह-शहापूर आणि लावडा या गावांचा समावेश आहे.

खडीमल येथे ६ टँकरने, मोथा येथे ३ टँकरने, तर आकी आणि बहादरपूर येथे प्रत्येकी एका टँकरने पाणी पुरवले जात आहे. उर्वरित चार गावांमध्ये प्रत्येकी दोन टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे.प्रशासनाच्या वार्षिक अनुभवानुसार, येत्या काळात आणखी काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. पाणीपुरवठा विभागाने तयार केलेल्या टंचाई उपाययोजनांच्या आराखड्यानुसार, उन्हाळ्याच्या चार महिन्यांत १५ गावांमध्ये टँकर किंवा बैलगाडीने पाणीपुरवठा करण्याची वेळ येऊ शकते. यासाठी सुमारे ३० लाख रुपये खर्चाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.संपूर्ण जिल्ह्यात पाणीटंचाईची समस्या गंभीर असून, १४ तालुक्यांमधील ५४५ गावांमध्ये पाणीटंचाई जाणवत आहे. यावर मात करण्यासाठी ७२२ उपाययोजना आखण्यात आल्या आहेत, ज्यासाठी १९ कोटी ७ लाख ५५ हजार रुपये खर्च अपेक्षित आहे.

या प्रस्तावित उपाययोजनांमध्ये टँकरने पाणीपुरवठा, तात्पुरत्या नवीन नळ योजना, विहिरींचे अधिग्रहण आणि इतर आवश्यक उपाययोजनांचा समावेश आहे. यावर्षीचा उन्हाळा अधिक तीव्र असल्याने, मे महिन्याच्या अखेरपर्यंत जवळपास सर्वच उपाययोजना कार्यान्वित कराव्या लागतील, असे प्रशासनाने म्हटले आहे. जिल्हा परिषदेने ऑक्टोबर ते डिसेंबर, जानेवारी ते मार्च आणि एप्रिल ते जून असे तीन स्वतंत्र कृती आराखडे यापूर्वीच तयार केले आहेत.

# १८ मे पासून विद्यापीठीय कर्मचारी आंदोलन करणार

### प्रलंबित मागण्यांसाठी राज्य शासनाविरुद्ध एल्गार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**– राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील कर्मचाऱ्यांनी राज्य शासनाविरुद्ध आंदोलनाची घोषणा केली आहे. विविध प्रलंबित मागण्यांसाठी हे कर्मचारी १८ मे पासून साखळी आंदोलन सुरू करणार आहेत. 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती'चे अध्यक्ष अजय देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी जळगाव येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत शासनाकडे वारंवार निवेदने देण्यात आली होती. तसेच लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊनही चर्चा करण्यात आली. मात्र,



शासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने कृती समिती आता आक्रमक झाली आहे. तीन लाभांच्या आश्वासित प्रगती योजनेसह इतर अनेक प्रलंबित मागण्यांसाठी हे आंदोलन केले जाणार आहे.


सोमवारी जळगाव येथे झालेल्या बैठकीत आंदोलनाची पुढील दिशा आणि धोरण निश्चित करण्यात आले. यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन निवेदन सादर करणे, काळ्या फिती लावून काम करणे, निदर्शने आणि धरणे आंदोलन यांचा समावेश आहे. या बैठकीला कृती समितीचे पदाधिकारी मिलींद भोसले, रावसाहेब त्रिभुवन, प्रकाश म्हसे, दिनेश दखने, डॉ. कैलास पाथ्रीकर, आनंद खामकर, अरूण सपकाळे, संदीप हिवरकर, अशोक रानवडे यांच्यासह राज्यातील विविध कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रस्तावित आंदोलनाचे संकेत शासनाला यापूर्वीच देण्यात आले होते. दोन महिन्यांपूर्वी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील बैठकीनंतर प्रलंबित मागण्यांबाबत शासनाला निवेदन सादर करण्यात आले होते. मात्र, या निवेदनाची शासनाने दखल न घेतल्याने विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

# भाऊ, शहरात पाण्याचाही धर्म उरला नाही;

## तहानलेल्यांसाठी सोयींचा अभाव ; पाणपोई संस्कृतीच धोक्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

तहाणलेल्यांना पाणी पाजणे हा पूर्वी धर्म समजला जात होता. उन्हाळ्याच्या कडक उन्हात वाटसरूंना मोफत पिण्याच्या पाण्याची सोय 'पाणपोई'द्वारे केली जात होती. मात्र, आता त्याचाही व्यवसाय झाला आहे. लोकांना धर्माचा विसर पडल्याची खंत तहानेने व्याकूळ झालेले वाटसरू ६५ वर्षीय मोतीराम बडगे यांनी व्यक्त केली.



नातेवाईक आजारी असल्याने त्यांना भेट देण्यासाठी ते अमरावतीत मध्ये आले होते. भेट घेऊन घरी जाण्यासाठी भर उन्हात निघाले. तहान लागल्याने रस्त्याने कुठे पाणपोई आहे काय, याचा शोध घेत होते. एका चौकात पाणपोई दिसली, मात्र ती बंद होती. ना इलाजाने त्यांना टपरीवर पाण्याची बाटली विकत घेऊन तहान भागवावी लागली. गावात कुणालाही पाणी मागितले तर धर्म म्हणून कुणीही देतं.मात्र, शहरात कुणाला मागावे हा प्रश्न त्यांना पडला. 'पाण्याचा धर्म' म्हणून ओळखली जाणारी ही संस्कृती आधुनिकतेच्या लाटेत हरवत चालल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

### पाणपोईसाठी पुढाकाराची गरज

पूर्वी शहरातील चौक, बसस्थानके, मंदिर परिसर किंवा बाजारपेठेत स्वयंसेवी संस्था, दानशूर व्यक्ती आणि व्यापारी मंडळांकडून पाणपोईची व्यवस्था केली जात असे. मातीचे माठ, थंड पाणी आणि बाजूला ठेवलेले ग्लास ही साधी पण माणुसकीची जिवंत उदाहरणे होती. मात्र, आता ही जागा थंड पेयांच्या दुकानांनी घेतली आहे. तहानलेल्यांची तहान भागविण्यासाठी पाणपोई लावण्यासाठी पुढाकाराची गरज आहे.

# जिल्हा परिषदेच्या १६६ शाळांचे उद्दीष्ट

## प्रसाधनगृहांची ४४ शाळांना प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

एकीकडे शिक्षण व्यवस्था सुदृढ करण्यासाठी शासनाकडून उपाययोजना करण्यात येत असताना दुसरीकडे मात्र सरकारी शाळांमध्ये मूलभूत सुविधाच पूर्ण होऊ शकत नसल्याचे विदारक चित्र जिल्ह्यात दिसून येते. जिल्ह्यातील ४४ जिल्हा परिषद शाळांमध्ये आजही प्रसाधनगृह नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. जिल्ह्यात १६६ प्रसाधनगृहांचे उद्दीष्ट ठेवण्यात आले होते, त्यापैकी १२२ शाळांमध्ये प्रसाधनगृहांची कामे पूर्णत्वास गेली असून अद्यापही ४४ शाळा त्यापासून वंचितच आहेत. एकीकडे शिक्षण व्यवस्थेच्या




सुदृढीकरणाचे दावे शासनाकडून केले जातात तर दुसरीकडे शिकस्त वर्गखोल्या बांधकाम, प्रसाधनगृहांच्या बांधकामासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसतो. अशा अनेक समस्यांना विद्यार्थ्यांसह शिक्षक व मुख्याध्यापकांना तोंड द्यावे लागते. लवकरच उर्वरित प्रसाधनगृहांची कामे मार्गी लागणार असल्याचे शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

### शाळांच्या प्रसाधनगृहांची स्थिती

| तालुका : | उद्दीष्ट : | कामे पूर्ण : | शिल्लक |
|---|---|---|---|
| अचलपूर : | १३ : | ९ : | ५ |
| अमरावती : | ५ : | ५ : | ० |
| अंजनगाव : | ६ : | १ : | ५ |
| भातकुली : | ३ : | ० : | ३ |
| चांदूरबाजार : | ७ : | ४ : | ३ |
| चांदूररेल्वे : | ० : ० : ० | | |
| चिखलदरा : | २५ : | २५ : | ० |
| दर्यापूर : | ११ : | ११ : | ० |
| धामणगाव : | ७ : | ४ : | ३ |
| धारणी : | ४० : | ३३ : | ७ |
| मोर्शी : | ८ : | ३ : | ५ |
| नांदगाव खं. : | १९ : | १० : | ९ |
| तिवसा : | १४ : | ११ : | ३ |
| वरुड : | ८ : | ६ : | २ |
| एकूण : | १६६ : | १२२ : | ४४ |

# भंगार दुकानातून १.४९ लाखांचा ॲल्युमिनियम वायर जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**जवाहर गेट येथील एका भंगार दुकानातून गुन्हे शाखेच्या पथकाने सोमवारी दुपारी १ लाख ४९ हजार ७०० रुपयांचा ॲल्युमिनियम वायर जप्त व दुकान मालक निरंजन संजय अग्रवाल (वय २५ रा. जवाहरगेट) याला खोलापुरीगेट पौलिसांच्या ताब्यात दिले.

गुन्हे शाखेचे पथक शहरात गस्तीवर असतांना जवाहरगेट येथील अग्रवाल यांच्या भंगारच्या दुकानात महावितरण विभागाचा ॲल्युमिनियम वायर मोठ्या प्रमाणात साठवून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या आधारावर सोमवारी दुपारी पोलिसांनी दुकानात जाऊन पाहणीकेली. पाहणीत ॲल्युमिनियम वायरचे ७ बंडल दिसले.वायर खरेदीबाबतचे कागदपत्र पोलिसांनी अग्रवाल याला मागितली. मात्र तो कागदपत्रे दाखवू शकला नाही. त्यामुळे संबंधित वायर महावितरणचे असल्याची शंका असल्यामुळे पोलिसांनी संपूर्ण वायर जप्त केले तसेच अग्रवालला ताब्यात घेऊन खोलापुरीगेट पोलिसांचा ताब्यात दिले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# कवडीमोल भावामुळे कांदा उत्पादक संकटात

## तळेगाव ठाकूरच्या शेतकऱ्यांची प्रशासनाकडे मदतीची मागणी



### कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया :

एक एकर कांद्यासाठी जवळपास ९५ हजार रुपये खर्च येतो, तर काढणीसाठी २० हजार रुपये वेगळे मोजावे लागतात. एवढा खर्च करूनही बाजारात भाव मिळत नाही. शासनाने तातडीने मदत द्यावी.कांदा उत्पादक-**मारोती निमकर**

बुरशी, करपा रोग आणि उष्णतेमुळे उत्पादन घटले. त्यात पडत्या भावामुळे शेतकऱ्यांच्या हातात काहीच राहत नाही. कांद्याला हमीभाव मिळाला तरच शेतकरी टिकेल.कांदा उत्पादक-**दादाराव घोरमाडे-**

**सुनील घोरमाडे**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८तळेगाव ठाकूर**
अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर हे गाव कांदा उत्पादनासाठी प्रसिद्ध असून सध्या गावात कांदा काढणी व कापणीला सुरुवात झाली आहे. मात्र बाजारपेठेत कांद्याला कवडीमोल भाव मिळत असल्याने कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

तळेगाव ठाकूर परिसरात मोठ्या प्रमाणावर कांद्याची लागवड करण्यात येते. कांदा पिकासाठी प्रथम बी पेरणी, रोप तयार करणे, त्यानंतर लागवड, फवारणी, निंदणी, खते, शेताची मशागत, काढणी व वाहतूक अशा प्रत्येक टप्प्यावर मोठा खर्च आणि मेहनत घ्यावी लागते. एका एकरासाठी तब्बल ९५ हजार रुपये खर्च होत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.यावर्षी कांदा काढणीसाठी बाहेरून मजूर आणावे लागत असून एकराला सुमारे २० हजार रुपये मजुरी खर्च करावा लागत आहे. शेत दूर असल्यामुळे भाड्याने ट्रॅक्टर करून मजूर ने-आण करावी लागत असून अतिरिक्त खर्च वाढला आहे.त्यातच कांदा पिकावर बुरशी, करपा रोग आणि वाढत्या तापमानाचा परिणाम झाल्याने उत्पादनात घट झाली आहे. उत्पादन कमी आणि बाजारभावही अत्यल्प असल्याने शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट उभे ठाकले आहे.कांदा उत्पादक शेतकरी खरीप हंगामासाठी काही कांदा साठवून ठेवतात, जेणेकरून पुढील पिकांसाठी लागणारा खर्च भागवता येईल. मात्र सध्याच्या पडत्या भावामुळे हे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने लक्ष देऊन कांद्याला हमीभाव, अनुदान अथवा आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. अन्यथा कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढवण्याची भीती व्यक्त होत आहे.

# कढाव ग्रामस्थांचा पंचायत समितीवर मोर्चा

## महिलांचा आक्रमक पवित्रा, अधिकारी गैरहजर असल्याने संताप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती ४**
गावात भीषण पाणीटंचाईने नागरिकांचे हाल होत असताना ग्रामसेवकांच्या मनमानी कारभारामुळे ग्रामस्थांचा संताप अनावर झाला आहे. पिण्याच्या पाण्यासाठी महिला, पुरुष आणि ज्येष्ठ नागरिकांना भर उन्हात वणवण भटकावे लागत असताना ग्रामपंचायतच्या कारभाराकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सरपंच व उपसरपंच यांना वेळोवेळी डावलणे, त्यांचे फोन ब्लॅकलिस्टमध्ये टाकणे तसेच लग्न दाखले, मृत्यू दाखले यासारखी महत्त्वाची कागदपत्रे देण्यास टाळाटाळ करणे, अशा प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. परिस्थिती असह्य झाल्याने संतप्त ग्रामस्थांनी थेट धारणी पंचायत समिती गाठत बिडीओ कार्यालयावर धडक दिली. या गंभीर प्रकाराची माहिती उपसरपंच विनोद पाटणकर यांनी भाजप जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर



यांना दिली. माहिती मिळताच श्री. भिलावेकर यांनी तातडीने पंचायत समितीवर धाव घेतली. मात्र तेथे पोहोचताच बीडीओंसह अनेक अधिकारी गैरहजर असल्याचे दिसून आले. संपूर्ण पंचायत समिती कार्यालय ओस पडलेले पाहून प्रभुदास भिलावेकर संतप्त झाले. ग्रामस्थांनी संबंधित ग्रामसेवकाला तत्काळ बोलविण्याची मागणी केली. मात्र ग्रामसेवकाकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. यामुळे उपस्थित महिला व नागरिकांनी आक्रमक भूमिका घेत ग्रामसेवकाविरोधात आक्रमक भूमिका घेतली. माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांनी पंचायत समितीतील ढिसाळ व बोगस कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करीत जनतेला पाण्यासाठी वणवण फिरावे लागते आणि अधिकारी कार्यालयात नसतात. पंचायत समितीमध्ये लोकांना पिण्याच्या पाण्याचीही सुविधा नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे, असे काम चालणार नाही, अशी सक्त ताकीद श्री. भिलावेकर यांनी दिली. यावेळी उपसरपंच विनोद पाटणकर, प्रभारी बिडीओ कामाजी ठोंबरे तसेच कढाव गावातील महिला व पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दलित वस्ती निधीचे मतदारसंघनिहाय नियोजन

## विरोधकांचा आक्षेप, पालकमंत्र्यांच्या हस्तक्षेपाने आता अंगणवाडीस प्राधान्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती-**
'दलित वस्ती सुधारणा' या शीर्षांतर्गत आलेला निधी महापालिकेने अन्यत्र वापरल्याचे आरोप होऊ लागले आहेत. दलित वस्त्यांमधील विकासकामांसाठी हा निधी असताना तो प्रभागनिहाय असलेल्या वस्त्यांमध्ये न वापरता मतदारसंघनिहाय वापरण्यात आल्याचे वास्तव यानिमित्ताने समोर आले आहे. दरम्यान पालकमंत्र्यांनी शिल्लक राहिलेल्या तीन कोटी रुपयांच्या निधीतून अंगणवाडीची कामे करण्याच्या सूचना मनपा प्रशासनाला दिल्या आहेत. प्रशासकीय राजवटीत वर्ष २०२३-२४ व वर्ष २०२४-२५ साठी प्रत्येकी दहा कोटी, असे एकूण वीस कोटी रुपयांचा निधी महापालिकेस प्राप्त झाला आहे. या कालावधीत महापालिकेत सभागृह अस्तित्वात नसल्याने दलित वस्ती सुधारणांसाठीचा निधी प्रशासनाने स्वमर्जीने वापरला असल्याचे एकंदरीत झालेल्या कामांवरून दिसून आले आहे. शासनाच्या निर्णयानुसार पालकमंत्री अध्यक्ष असलेल्या दलित वस्ती सुधारणा या योजनेतील निधीचा वापर करताना सदस्यांच्या सुचनांवरून कामांचे नियोजन करण्यात येते. समाजकल्याण विभागाकडून लोकसंख्येच्या आधारे कामांना मंजुरी मिळाल्यानंतर नगरपरिषद प्रशासन त्यास प्रशासकीय मंजुरी प्रदान करते. या दोन वर्षांत प्रशासकीय राजवटीत प्रभागनिहाय कामांचे नियोजन करण्यात आले नसून विधानसभा मतदारसंघनिहाय करण्यात आले. या कामांवर दोन वर्षांत वीस कोटींपैकी सतरा कोटी रुपये खर्च झाले असून तीन कोटी रुपयांचा निधी शिल्लक आहे. विरोधी पक्षाने या कामांवर आमसभेत आक्षेप नोंदविले असून निधीचा गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. दरम्यान पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महापालिकेत घेतलेल्या आढावा बैठकीतही या मुद्द्यावर चर्चा झाली. पालकमंत्र्यांनी शिल्लक राहिलेल्या तीन कोटी रुपयांतून अंगणवाडीची कामे प्राधान्याने घेण्याची सूचना मनपा प्रशासनाला केली आहे. प्रशासनाने केलेल्या कामांमध्ये समाजमंदिर, रस्ते, नाल्या व पेव्हिंग ब्लॉक लावण्याची कामे केली आहेत.

### एकाच कामासाठी दोन वेळा नियोजन

पुष्पक कॉलनी येथील गजानन महाराज मंदिरासाठी टीनशेडच्या सभागृहाचे काम करण्यात आले आहे. या कामासाठी दोन वेळा निधीचे नियोजन करण्यात आल्याचे समोर आले आहे. एकाच कामासाठी दोन वेळा नियोजन करण्यात आल्याने हा मुद्दा वादग्रस्त व आक्षेपार्ह ठरला आहे. तथापि, या कामासाठी निधीच कमी पडल्याने त्याची तरतूद दोन वेळा करण्यात आल्याचे स्पष्टीकरण बांधकाम विभागाने दिले आहे.

# नांदगावपेठ एमआयडीसी मध्ये गतिरोधकांअभावी अपघात वाढले

## तातडीने उपाययोजना करण्याची नागरिकांची मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नांदगाव पेठ -** नांदगावपेठ एमआयडीसी परिसरातील मुख्य चौफुली रस्त्यावर गतिरोधक नसल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधत डिगरगव्हाणच्या प्रशासक जिलेश्वरी ठाकरे यांनी खासदार बळवंत वानखडे यांच्याकडे निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. सदर चौफुली रस्ता हा डिगरगव्हाण, डवरगाव, कापूसतळणी, माळेगाव, गुरुकुंज मोझरी, माहुली जहांगीर तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहा या भागांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे या रस्त्यावर जडवाहनांसह इतर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र, गतिरोधक नसल्यामुळे वाहनचालक भरधाव वेगाने वाहन चालवतात आणि त्यामुळे वारंवार अपघात घडत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत या ठिकाणी आठ ते दहा अपघात झाले असून, त्यामध्ये चार ते पाच जणांना जीव गमवावा लागला आहे.या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने या चौफुली रस्त्यावर योग्य आकाराचे चार गतिरोधक तत्काळ बांधण्यात यावेत तसेच पांढरे पट्टे व इशारा फलक लावण्यात यावे, अशी मागणी प्रशासक जिलेश्वरी ठाकरे यांनी निवेदनातून केली आहे.

# शौचालयाच्या टाक्यात बुडून आठ वर्षीय मुलाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती-**
शौचालयाच्या टाक्यात पडून बुडाल्यामुळे आठ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. खोलापुरीगेट ठाण्याच्या हद्दीत न्यू शिक्षक कॉलनी परिसरात रात्री आठ ते साडेआठच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. कार्तिक अमोल ठाकरे (वय आठ, रा. न्यू. शिक्षक कॉलनी, अमरावती), असे मृत मुलाचे नाव असल्याची माहिती खोलापुरीगेटचे पोलिस उपनिरीक्षक रणजित शेंडोकर यांनी दिली. न्यू शिक्षक कॉलनी परिसरात नव्याने बरीच बांधकामे सुरू आहेत. तेथेच राहणारी लहान मुले रविवारी रात्री लुपाछुपीचा खेळ खेळत होती. खेळताना मुले वेगवेगळ्या



ठिकाणी लपायला गेली. त्यातील कार्तिक ठाकरे नवीन घराचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी पोहोचला.

येथे घराच्या परिसरात शौचालयाचे टाके बांधलेले असून, ते सद्य:स्थितीत पाण्याने भरलेले होते. अचानक खेळता खेळता कार्तिकचा तोल जाऊन तो टाक्यात पडून बुडाल्याने त्याचा मृत्यू झाला.

इतर मुले खेळून घरी परत आली, परंतु कार्तिक हा रात्री साडेआठपर्यंत घरी न पोहोचल्यामुळे त्याच्या पालकांनी आजूबाजूने चौकशी करून पाहणी सुरू केली असता, नवीन बांधकामाच्या ठिकाणी शौचालयाच्या टाक्यात कार्तिक बुडालेल्या स्थितीत दिसला. त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती कार्तिक ठाकरे याला मृत घोषित केले.

# शेणखताचा तीव्र तुटवडा; जमिनीची सुपीकता घटण्याची भीती, शेतकऱ्यांसमोर नवे आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२८अमरावती -**रब्बी हंगाम संपत आल्याने जिल्ह्यातील शेतकरी खरीप हंगामाच्या तयारीला लागले असताना, यंदा शेणखताच्या तीव्र टंचाईने मोठे संकट निर्माण झाले आहे. पशुधनात झालेली घट, मजुरांची कमतरता आणि शेतीतील वाढते यांत्रिकीकरण यामुळे शेणखताची उपलब्धता मोठ्या प्रमाणात कमी झाली असून, याचा थेट परिणाम जमिनीच्या सुपीकतेवर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.सध्या जिल्ह्यात शेणखताचे दर गगनाला भिडले असून, तीन हजार ते चार हजार रुपये प्रति ट्रॅक्टर इतका दर देऊनही शेतकऱ्यांना शेणखत सहज उपलब्ध होत नाही. पारंपरिक शेती पद्धतीत शेणखताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जमिनीचा पोत टिकवून ठेवण्यासाठी तसेच उत्पादनवाढीसाठी शेणखत उपयुक्त ठरते. मात्र, अलीकडील काळात पशुपालनातील वाढता खर्च, कमी होत चाललेला नफा आणि बदलती ग्रामीण



जीवनशैली यामुळे शेतकऱ्यांनी जनावरांची संख्या कमी केली आहे.पूर्वी ग्रामीण भागात गायरान जमिनी मुबलक होत्या आणि जनावरांच्या देखभालीसाठी मजूरही सहज उपलब्ध होते. त्यामुळे शेणखताची कमतरता भासत नव्हती. मात्र आता परिस्थिती बदलली असून, गोठे रिकामे होत चालले आहेत. परिणामी शेणखताचे उत्पादन घटले असून, शेतीसमोर नव्या प्रकारचे संकट उभे ठाकले आहे.

# सकल मातंग समाजाची उपवर्गीकरणासाठी महाचर्चा बैठक

## जनगणना व बदर समिती अहवालावर भर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**
अमरावती येथे सकल मातंग समाजाच्या वतीने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या मागणीसंदर्भात महत्त्वपूर्ण महाचर्चा बैठक पार पडली. विश्रामगृह, चपराशी पुरा (कॅम्प) येथे आयोजित या बैठकीत विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला. उपवर्गीकरणाची रूपरेषा, त्याची गरज आणि १ मेपासून सुरू होणाऱ्या जनगणनेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.बैठकीत राज्य समन्वयक देवलाल अवचार यांनी मातंग




समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी उपवर्गीकरण का आवश्यक आहे यावर सविस्तर भाष्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनुसार समाजाची उभारणी करण्यासाठी शिक्षण, नोकरी व सामाजिक परिवर्तनावर भर देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. बदर समितीचा अहवाल लवकर जाहीर करावा, तसेच समाजाच्या सूचना व हरकती ३० एप्रिल २०२६ पर्यंत शासनाकडे पाठवाव्यात, असेही त्यांनी आवाहन केले.डॉ. रुपेश खडसे यांनी गेल्या १३ वर्षांपासून उपवर्गीकरणासाठी झालेल्या विविध आंदोलनांचा आढावा घेत सरकारवर दबाव निर्माण केल्याचा इतिहास मांडला.बैठकीत विजय जोंधळेकर, गणेशदास गायकवाड, ज्ञानेश्वर झोंबडे, बी.टी. अंभोरे, देविदास गायकवाड, अरुण सरकटे, कैलास स्वर्गे, फकिरा हिवराळे, आर.बी. संतापे, सुभाष शिंदे, आकाश खडसे, प्रतीक शिंदे यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.पुढील टप्प्यात बदर समितीचा अहवाल आल्यानंतर आणखी चर्चा सत्र घेण्याचे तसेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. शेवटी ज्ञानेश्वर झोंबडे यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

# बँकांनी कर्जवाटप करताना सकारात्मक राहावे -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

## उद्दीष्ट पूर्ण करणाऱ्या बँकांचा गौरव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती,**
गावपातळीवर उद्योग उभारताना आवश्यक असलेला पतपुरवठा बँकांनी करावा. यामुळे गावातही चांगले प्रक्रिया उद्योग उभे राहण्यास मदत मिळेल. त्यामुळे बँकांनी कर्जवाटप करताना उद्योगाप्रती सकारात्मक राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि प्रधानमंत्री सूक्ष्म प्रक्रिया उद्योगामध्ये कर्ज मंजुरीचे उद्दीष्ट पूर्ण करणाऱ्या बँकांचा सत्कार करण्यात आला. तसेच उद्दीष्ट पूर्ण करणाऱ्या बँकांचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, जिल्हा उद्योग अधिकारी नीलेश निकम, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदीप चेचरे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी बँकांची निर्मिती ही छोट्या उद्योगांना पतपुरवठा करण्यासाठी झाली आहे. हा पतपुरवठा हा सामान्य नागरिकांनी बचतीच्या स्वरूपात गोळा केलेल्या पैशातून केला जातो. मोठ्या उद्योगाप्रती बँकांचे धोरण सकारात्मक असताना छोट्या उद्योगांनाही पतपुरवठा करण्यासाठी पुढाकार



घेणे गरजेचे आहे. गावातील प्रक्रिया उद्योगांना पतपुरवठा झाल्यास ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होईल. गेल्या वर्षी जिल्ह्याने प्रधानमंत्री सूक्ष्म प्रक्रिया उद्योगांमध्ये राज्यात दुसरा क्रमांक पटकाविला आहे. संपूर्ण जिल्ह्यात शासन साहाय्य करणाऱ्या योजनांची एक हजाराहून प्रकरणे बँकांकडे सादर केली आहे. यात महिलांचा लक्षणीय सहभाग आहे. त्यामुळे सार्वजनिक आणि खासगी बँकांनी उद्योगांना मदत करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी कर्जप्रकरणे मंजूर करण्याचे उद्दीष्ट पूर्ण केलेल्या बँक व्यवस्थापकांचा सत्कार करण्यात आला. यात बँक ऑफ बडोदाचे प्रशांत गावंडे, लोहिता के. एस., जयदीप राठोड, बँक ऑफ इंडियाचे रणजित ठाकरे, घनश्याम ढवळे, बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रफुल्ल शेंडे, प्रशांत चरडे, रूपेश नंदनवार, प्रफुल्ल रसाळपायले, शिवशंकर फड, आलोक कोठेकर, मृणाल क्रांती राणा, कॅनरा बँकेच्या योगीता देशमुख, संदीप तेटे, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अजित लिंगाटे, महेंद्र येलमे, नवनीत उमाळे, अमर दाभर्डे, संदीप सूर्यवंशी, स्टेट बँक ऑफ इंडियाचे सुदीप्ता घोष, जयंत मोरे, पंकज समर्थ, कमर सगीर, रिचा निमोणकर, मधुकर तळपदे, अभिनव राऊत, निधी अग्रवाल, युनियन बँक ऑफ इंडियाचे अक्षय सोनोने तसेच स्टेट बँक ऑफ इंडियाचे प्रादेशिक व्यवस्थापक नवीनकुमार उप्पलवार, मुख्य व्यवस्थापक रवीकुमार दालू, ललित त्रिपाठी, बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रादेशिक व्यवस्थापक महेश डांगे, कॅनरा बँकेचे प्रादेशिक व्यवस्थापक रामबाबू मीना, बँक ऑफ बडोदाचे प्रादेशिक व्यवस्थापक राजेश कुमार, बँक ऑफ महाराष्ट्रचे जिल्हा समन्वयक अमोल मोरे यांचा स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला.

# आ.रवी राणा यांच्या पुढाकारातून 'महाराजस्व अभियान' विशेष शिबिर यशस्वी

## ७५०० लाभार्थ्यांना ७.४० कोटींचा लाभ





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

अमरावती तहसील कार्यालयात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत आयोजित समाधान विशेष शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष आ.रवि राणा यांच्या पुढाकारातून पार पडलेल्या या शिबिरात सुमारे ७,५०० लाभार्थ्यांना एकूण ७ कोटी ४० लाख रुपयांच्या विविध शासकीय योजनांचा लाभ वितरित करण्यात आला.शिबिराचे उद्घाटन आमदार रवी राणा यांच्या हस्ते वयोवृद्ध महिला लाभार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री व पालकमंत्र्यांकडून रवी राणा यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या, यावेळी उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाची सुरुवात महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.या विशेष शिबिरात एकूण ५७ शासकीय विभागांनी सहभाग घेत विविध योजनांचे स्टॉल उभारले होते. यात २५ ट्रॅक्टर व २५ मिनी ट्रॅक्टरचे वितरण, ३२०० पीआर कार्ड वाटप (त्यापैकी ३८० सिंधी समाजाला), उमेद अभियानांतर्गत बँक कर्ज, महिला बचत गटांना १३ शिलाई मशीन व ३२ पापड मशीन, शेळीपालन योजना, २२ व्यायामशाळा बांधकाम अनुदान, मनरेगा अंतर्गत ३०० विहिरी, 'लेक लाडकी' योजनेअंतर्गत ६०० लाभार्थी, ५०० शिधापत्रिका तसेच संजय गांधी योजनेतून सुमारे १२०० लाभार्थ्यांना सहाय्य देण्यात आले.याशिवाय उत्पन्न, जात व रहिवासी दाखले, आयुष्मान भारत कार्ड (१२००) आणि ६०० चष्म्यांचे वितरण अशा विविध सेवा नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. या उपक्रमामुळे नागरिकांचा वेळ वाचून त्यांना थेट लाभ मिळाल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले.या कार्यक्रमास नवनीत राणा, उपमहापौर सचिन भेंडे, तसेच विविध शासकीय अधिकारी व स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. आमदार रवी राणा यांनी सर्व ५७ स्टॉलला भेट देत कामकाजाचा आढावा घेतला.कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते डॉ. बबन बेलसरे, गौरी अमोल इंगळे तसेच जिल्हा नियोजन समितीचे नवनिर्वाचित सदस्य आशिष कावरे, विनोद जयस्वाल व सुनील खराटे यांचा सत्कार करण्यात आला.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी व स्थानिक पदाधिकाऱ्यांनी मोठे योगदान दिले. या उपक्रमामुळे सर्वसामान्य नागरिकांना एकाच ठिकाणी विविध शासकीय योजनांचा लाभ मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

---

# विद्यार्थ्यांच्या नावात आईला प्रथम स्थान

### राज्य शासनाचा क्रांतिकारी निर्णय, २०२६-२७ पासून अंमलबजावणी

## सर्व शाळांसाठी नियम बंधनकारकबंधनकारक

अरुण जोशी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८ अमरावती**

महाराष्ट्र शासनाने शिक्षण क्षेत्रात लिंग समानतेला प्रोत्साहन देणारा एक महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारी निर्णय जाहीर केला आहे. नव्या नियमानुसार, विद्यार्थ्यांच्या नावामध्ये आता सर्वप्रथम आईचे नाव, त्यानंतर वडिलांचे नाव आणि शेवटी आडनाव असा क्रम अनिवार्य करण्यात आला आहे. हा नियम २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील सर्व शाळांमध्ये लागू होणार असून, त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.राज्यातील शासकीय, अनुदानित तसेच खासगी शाळांसह सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्थांवर हा नियम लागू राहणार आहे. शाळा प्रशासनाने याची तात्काळ अंमलबजावणी करणे आवश्यक असून, नियमाचे उल्लंघन झाल्यास संबंधित संस्थांवर दंडात्मक कारवाई होऊ शकते, असा इशारा शिक्षण विभागाने दिला आहे.या निर्णयानुसार, विद्यार्थ्यांच्या सर्व अधिकृत कागदपत्रांवर आईचे नाव प्रथम क्रमांकावर झळकणार आहे. यात हजेरीपत्रक, गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, प्रवेश-निर्गम उतारा यांसारख्या सर्व शैक्षणिक दस्तावेजांचा समावेश आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची ओळख आता अधिकृतरीत्या मातेच्या नावाशी जोडली जाणार आहे.विभक्त किंवा घटस्फोटित पालकांच्या बाबतीत आईचे नाव प्राधान्याने वापरण्यात येईल. तसेच दत्तक मुलांच्या बाबतीत दत्तक आईचे नाव नोंदविणे आवश्यक राहील. विशेष परिस्थितीत बदल करायचा असल्यास जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांची परवानगी घेणे बंधनकारक राहणार आहे.शाळांमधील दैनंदिन व्यवहारातही या बदलाची अंमलबजावणी होणार आहे. हजेरी घेताना किंवा विविध शालेय कार्यक्रम, स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांची ओळख करून देताना आईचे नाव + वडिलांचे नाव + आडनाव असा क्रम पाळणे आवश्यक असेल. उदाहरणार्थ, सीमा रमेश पाटीलचा मुलगा/मुलगी असा उल्लेख करणे अनिवार्य राहणार आहे.राज्य शासनाने हा निर्णय महिलांच्या सन्मानासाठी आणि समाजात लिंग समानतेची जाणीव अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने घेतल्याचे सांगितले आहे. मातेची भूमिका अधोरेखित करणे, तसेच मुलांची ओळख मातेशी जोडणे हा या निर्णयामागील मुख्य हेतू आहे. हा उपक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असल्याचेही सांगण्यात येत आहे.दरम्यान, या निर्णयामुळे सामाजिक स्तरावर सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महिलांना कुटुंब आणि समाजात अधिक सन्मान मिळावा, तसेच मुलांच्या ओळखीत आईचे स्थान अधिक दृढ व्हावे, यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**या कागदपत्रांवर झळकेल आईचे नाव**

हजेरीपत्रक, गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, प्रवेश निर्गम उतारा यासह सर्व अधिकृत दस्तऐवजांवर आईचे नाव प्राधान्याने छापले जाईल.

---

# वरूड-मोर्शी महामार्गावर कारची झाडाला धडक

## एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू, चालक गंभीर जखमी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८वरुड**

लग्नसमारंभाच्या आनंदावर काळाने विरजण घातल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी सकाळी घडली. वरूड-मोर्शी महामार्गावर झालेल्या एका भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. भरधाव कार रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर आदळल्याने हा अपघात घडला. यामध्ये एका तीन वर्षांच्या चिमुरडीसह तिच्या आईचा आणि आजोबांचा मृत्यू झाला, तर कारचालक गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार नागपूर येथील कामठी खैरी भागातील विनायक कॉलनी येथील रहिवासी असलेले नांदे कुटुंब एका लग्नकार्यासाठी जात होते. त्यांची कार (एमएच ४०/ केआर ०७२१) वरूड-मोर्शी महामार्गावरील खडकी फाट्याजवळ आली असता, चालकाचे नियंत्रण सुटले आणि वाहन थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या मोठ्या झाडावर जाऊन धडकले. ही धडक इतकी जबर होती की, कारचा समोरचा भाग पूर्णपणे चक्काचूर झाला.

**मृतांची ओळख पटली**

या अपघातात समाधान किसनराव नांदे (६२), किरण गोपाल नांदे (२८) आणि दिया गोपाल नांदे (३) या तिघांचा मृत्यू झाला. समाधान नांदे यांचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी असलेल्या किरण आणि चिमुकल्या दिया हिला वरूड येथील ग्रामीण रुग्णालयात नेत असताना त्यांनी वाटेतच प्राण सोडले. कार चालवणारे गोपाल समाधान नांदे (३४) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

अपघाताचा आवाज ऐकताच खडका येथील सरपंच राहुल फुले आणि स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. बेनोडा येथून तातडीने रुग्णवाहिका पाचारण करून जखमींना बाहेर काढण्यात आले. घटनेची माहिती मिळताच बेनोडा पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आहे. अपघात नेमका कशामुळे झाला-तांत्रिक बिघाड की, चालकाला आलेली डुलकी-याचा तपास पोलीस करीत आहेत. एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

---

# तिहेरी कामाच्या ओझ्याखाली शिक्षक

## ४६Amo उष्णतेत शाळा सुरू ठेवण्याच्या आदेशांवर संताप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्राथमिक शिक्षक सध्या शैक्षणिक आणि अशैक्षणिक कामांच्या तिहेरी ओझ्याखाली दबले गेले आहेत. मे २०२६ महिन्यात नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण, जनगणना आणि मतदारयादी पडताळणी ही महत्त्वाची कामे एकाच वेळी आल्याने शिक्षकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथीच्या नवीन अभ्यासक्रमासाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षण ११ ते १४ मे दरम्यान, तर तालुकास्तरीय प्रशिक्षण १८ ते ३० मे या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. याच काळात २०२७ च्या जनगणनेचा पहिला टप्पा सुरू असून शिक्षकांना प्रगणक व पर्यवेक्षक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच बीएलओ म्हणून मतदारयादी पडताळणीसाठी घरोघरी जाऊन सर्वेक्षण करावे लागत आहे.या सर्व कामांमुळे शिक्षकांच्या उन्हाळी सुट्ट्यांवर गदा आली असून, कामावर गैरहजर राहिल्यास कारवाईची भीतीही निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशिक्षणाचे वेळापत्रक बदलण्याची मागणी शिक्षक संघटनांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.दरम्यान, २८ ते ३० एप्रिल दरम्यान अंदाज समितीच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर ४६ अंश तापमानात शाळा सकाळी ७ ते सायंकाळी ५ पर्यंत सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याचवेळी पहिल्या वर्गाचा प्रवेशोत्सव घेण्याचे निर्देश देण्यात आल्याने शिक्षक आणि मुख्याध्यापक अडचणीत आले आहेत.कडाक्याच्या उन्हात लहान विद्यार्थ्यांना शाळेत बोलावणे धोकादायक असल्याची भावना व्यक्त होत आहे. एसी कार्यालयातून घेतलेले निर्णय वास्तवापासून दूर आहेत, अशी टीका शिक्षकांकडून केली जात असून, या निर्णयांचा पुनर्विचार करण्याची मागणी जोर धरत आहे.

---

# भर उन्हाळ्यात राज्यावर वीज संकट ! तीन वीज निर्मिती संच बंद




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २८नागपूर** राज्यात वाढत्या उकाड्यामुळे विजेची मागणी ३० हजार मेगावॅटच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे. त्याचवेळी महानिर्मितीच्या कोराडी, चंद्रपूर आणि नाशिक येथील प्रत्येकी एक असे तीन वीज निर्मिती संच बंद पडले आहेत. त्यामुळे मागणी आणखी वाढल्यास वीज पुरवठ्यावर ताण येण्याची शक्यता असून, अखंडित वीज पुरवठा राखणे हे वीज यंत्रणेसमोर मोठे आव्हान ठरणार आहे.

विदर्भासह राज्यातील अनेक भागांत तापमानात मोठी वाढ झाली असून उकाड्याने नागरिक त्रस्त आहेत. उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी वातानुकूलित यंत्रणा, कुलर, पंखे आदी उपकरणांचा वापर वाढला आहे. याशिवाय कृषी पंपांच्या वाढत्या वापरामुळेही विजेची मागणी सातत्याने वाढत आहे. सोमवारी (२७ एप्रिल २०२६) दुपारी २.२० वाजता राज्यातील विजेची मागणी २९,५०३ मेगावॅट इतकी नोंदवली गेली, त्यात मुंबईतील सुमारे ४ हजार मेगावॅट मागणीचा समावेश होता. ही मागणी येत्या काळात आणखी वाढण्याचे संकेत आहे.

दरम्यान, कोराडी प्रकल्पातील संच क्रमांक ८, नाशिकमधील संच क्रमांक ४ आणि चंद्रपूरमधील संच क्रमांक ७ विविध कारणांमुळे बंद पडले आहेत. या संचांमधील वीज निर्मिती थांबल्याने राज्यात अचानक मागणी वाढल्यास पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता वीज क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्ती केली जात आहे.

**महानिर्मितीकडून ६,८४७ मेगावॅट वीजनिर्मिती**

राज्यातील २९,५०३ मेगावॅट मागणीपैकी सुमारे १७,७५० मेगावॅट वीज निर्मिती होत होती. त्यापैकी महानिर्मितीकडून ६,८४७ मेगावॅट उत्पादन होत होते. यात औष्णिक प्रकल्पांतून ६,३११ मेगावॅट, उरण गॅस प्रकल्पातून २६८ मेगावॅट, कोयना जलविद्युत प्रकल्पातून १५६ मेगावॅट आणि सौर ऊर्जेतून ९७ मेगावॅट वीज निर्मितीचा समावेश आहे. खासगी प्रकल्पांत जिंदल (९४७), अदानी (२,५२८), आयडियल (२४४), रतन इंडिया (१,२९९), बुटीबोरी (२९१) आणि एसडब्ल्यूपीजीएल (३१९ मेगावॅट) यांचे योगदान होते.




---

# दर्यापूरमध्ये कॅफेच्या नावाखाली खासगी कॅबिन?

### नागरिकांमध्ये संशय, प्रशासनाचे मौन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८दर्यापूर :** शहरात काही कॅफेमध्ये बंदिस्त व खासगी कॅबिन उपलब्ध करून दिल्या जात असल्याची जोरदार चर्चा सध्या रंगत आहे. या कॅबिनचा नेमका वापर कशासाठी केला जातो, याबाबत नागरिकांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले असून पालकवर्गातही चिंता व्यक्त केली जात आहे.स्थानिकांच्या मते, काही कॅफेमध्ये खुले बसण्याऐवजी पूर्णपणे बंदिस्त कॅबिन दिल्या जात असून त्या ठिकाणी कोणतीही देखरेख नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या ठिकाणी गैरप्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.दरम्यान, या प्रकरणावर प्रशासनाची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई किंवा तपास सुरू झाल्याचे दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. मोठी घटना घडल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा सवालही उपस्थित केला जात आहे.दर्यापूरसारख्या शहरात अशा प्रकारचे उपक्रम सुरू असतील, तर स्थानिक प्रशासन, पोलीस आणि नगरपरिषद यांनी संयुक्तपणे तपास करून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची खात्री करणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

सामाजिक कार्यकर्ते अक्षय रायबोले यांनीही या प्रकरणाची सखोल चौकशी करून नियमांचे उल्लंघन आढळल्यास कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. शहरातील सामाजिक वातावरण बिघडू नये यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष घालण्याची गरज व्यक्त होत आहे.


सोमेश्वर पुसतकर
सांस्कृतिक महोत्सव २०२६
हे सुरांनो चंद्र व्हा..
गुरूवार, ३० एप्रिल २०२६, सायं. ६.३० वाजता